नि.दि.दा.क्र. १४८/२०१६
शुभम वि. बाबुराव
नि.क्र.९१

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**<u>प्रतिवादी क्र.२ व ३ करीता साक्षीदार क्र.५ यांची जबानी</u>**

माझे संपूर्ण नाव - दिलीप सुग्रीव सुर्यवंशी,

वय- ५८ वर्षे,

व्यवसाय- शेती ,

राहणार- माकणी थोर ता. निलंगा, जि. लातूर

**<u>प्रतिवादींकरीता पुढील सरतपास विधीज्ञ श्री.एम.आर.जगताप यांच्या तर्फे सुरू</u>**

५. दि.१३.०८.२०१४ रोजीचे खरेदीखत नोंदणी क्र.३०७१/२०१४ मला आता दाखविले. त्या खरेदीखताद्वारे मी दावा मिळकत विकत घेतली आहे. तसेच दि.१३.०८.२०१४ रोजीचे खरेदीखत नोंदणी क्र.३०७२/२०१४ मला आता दाखविले. त्या खरेदीखताद्वारे मी दावा मिळकत विकत घेतली आहे. दि.१३.०८.२०१४ रोजीचे खरेदीखत नोंदणी क्र.३०७१/२०१४ वर लिहून घेणार म्हणून माझी सही आहे व त्यावर लिहून देणार म्हणून तेजाबाई बाबूराव ढगे यांची सही आहे व त्यावर साक्षीदार म्हणून प्रशांत काळगे व अनंत माने यांच्या सहया आहेत.

६. दि.१३.०८.२०१४ रोजीचे खरेदीखत नोंदणी क्र.३०७२/२०१४ वर लिहून घेणार म्हणून माझी सही आहे व त्यावर लिहून देणार म्हणून बाबूराव ढगे यांची सही आहे व त्यावर साक्षीदार म्हणून प्रशांत काळगे व अनंत माने यांच्या सहया आहेत.

**<u>वादी करीता उलटतपास विधिज्ञ श्री.यु.एस.जाधव यांचेकडून</u>**

७. तेजाबाई माझी सखी मावशी आहे. तेजाबाई व माझ्या आई सख्या

नि.दि.दा.क्र. १४८/२०१६
शुभम वि. बाबुराव
नि.क्र.९१

बहिणी आहेत हे म्हणणे खरे आहे. मी माझी लेखी कैफीयत दाखल केली आहे. सविता यांना मी ओळखत नाही. माझ्या लेखी कैफीयतीमध्ये उल्लेख केलेल्या सविता यांना मी ओळखत नाही. युवराज सध्या हयात नाही. त्यांना मी ओळखत होतो. मी माझी लेखी कैफीयतच दाखल केलेली नाही. त्याच्यातील मजकूर मला सांगण्याचा प्रश्न उद्भवला नाही हे म्हणणे खरे आहे. मी या प्रकरणात दाखल असलेल्या लेखी कैफीयेतीवर माझी सहीच केली नाही. मी न्यायालयात आज पहिल्यांदाच आलो आहे. माझा जन्म सन १९६९ चा आहे. बाबुराव आणि तेजाबाई यांचे लग्न मला माहित नाही.

८. दाव्यातील वादाचे स्वरुप मला माहित नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात माझे व शुभम मध्ये शेतीचा वाद आहे. मी शुभम यांना ते ५ वर्षे वयाचे असताना पाहिले आहे. मी दैवताबाई बाबुराव ढगे यांना ओळखत नाही. मला दाव्याची आदेशीका प्राप्त झाल्यानंतर मी दैवताबाई बाबत कसलीच चौकशी केलेली नाही. युवराज यांच्या आईचे नाव दैवताबाई असल्याचे सांगितले जात होते. मला बाबूराव यांनी दैवताबाई या युवराजच्या आई असल्याचे सांगितले होते.

९. बाबूराव व तेजाबाई यांच्यापुर्वी मी खरेदी केलेल्या जमिनीचे मालक कोण होते ते मला माहित नाही. बाबूराव व तेजाबाई यांनी युवराज यांच्या वारसांना मिळकत मिळू नये म्हणून विना मोबदला माझ्या हक्कात खरेदीखत करुन दिले हे म्हणणे खरे नाही. मोबदला रक्कम मी खरेदीखतापुर्वीच दिलेली आहे. खरेदीखतापुर्वी बाबूराव व तेजाबाई यांना मी मोबदला दिला हे दाखवणारा पुरावा माझ्याकडे नाही. सन २०१३-२०१४ मध्ये माझ्या खात्यावर रू.८,०००००/- ते १०,०००००/- होते किंवा कसे हे मला आठवत नाही, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात मी मोबदला रक्कम त्यापुर्वीच दिली आहे. मी कोणत्या तारखेस, कोणाला व किती मोबदला रक्कम तशी दिली हे सांगू शकत नाही. त्या बाबत माझ्या कडे पुरावा ही नाही. तेजाबाई यांना

**नि.दि.दा.क्र. १४८/२०१६**
**शुभम वि. बाबुराव**
**नि.क्र.९१**

मुलबाळ नाही हे म्हणणे खरे आहे. तेजाबाई या मला मुलाप्रमाणे मानतात व वागवतात हे म्हणणे खरे आहे. मी खोटा सरतपास दाखल केला हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.09.25 16:13:41 +0530

(रवि वि. पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर

दि.२४/०९/२०२५